# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट ४१८-२०२४ दिनांक-०९/११/२०२४

## “ ७ वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीतास जिल्हा प्रयागराज, राज्य उत्तरप्रदेश येथुन अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा यांना यश ”

-----///----

दिनांक ०३/११/२०२४ रोजी रात्री ०९.१५ वाजता ते १०.१५ वाजताचे दरम्याने आरोपीत याने त्याचे रहाते आनंद निवास बिल्डिंगच्या टेरेसवर, फिर्यादी नामे (महिला) यांच्या ०७ वर्षाच्या बालिकेला, आरोपीत नामे रमेशकुमार जयसवाल वय- अंदाजे २० वर्षे, रा. भाईंदर पुर्व. ता.जि.ठाणे. याने चॉकलेट, आईस्क्रीम देण्याचे अमिष दाखवुन बालिकेला, बिल्डिंगच्या टेरेसवर घेऊन जाऊन तिचेवर लैंगीक अत्याचार केला व तेथुन पळुन गेला.

सदर आरोपीताचे विरुध्द फिर्यादी यांनी दिनांक ४/११/२०२४ रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन **नवघर** पोलीस ठाण्यात गु.र.क्र. ६०४/२४ बी.एन.एस कलम ६४,६५(२),७४ सह बालकांचे लैंगिक अपरांधांपासुन संरक्षण अधि कलम ४,५(एम),८,१२ प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

मा. पोलीस आयुक्त सो यांनी या संवेदनशील गुन्हयांतील आरोपीत याचा शोध घेण्यासाठी आदेशीत केले होते. गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमिराचे अधिकारी व अंमलदार यांचे तपास पथक सदर गुन्हयांतील पाहीजे आरोपीत यांचा शोध घेत होते.

यातील आरोपीत याचा शोध घेण्यासाठी गुन्हे शाखा कक्ष-१ येथुन दोन तपास पथके, राजकोट, राज्य राजस्थान व प्रयागराज, राज्य उत्तरप्रदेश येथे पाठविण्यात आलेली होती. सदर गुन्हयातील आरोपीत रमेशकुमार रामरक्षा जयसवाल वय-२० वर्षे, मुळ रा. ग्राम उनोर, पोस्ट जेरा, जिल्हा प्रयागराज दिनांक ०८/११/२०२४ रोजी गठेवरा चौकी, मेजा रोड, प्रयागराज, जिल्हा प्रयागराज, राज्य उत्तरपद्रेश येथे पो.हवा./संजय शिंदे व पो.हवा./संतोष लांडगे यांचे पथकाला मिळुन आलेला आहे. आरोपीत यांचेकडे केलेल्या चौकशीमध्ये आरोपीतांनी गुन्हा केल्याची कबुली दिलेली आहे. आरोपीत यास मा. प्र. मुख्य न्यायिक मॅजीस्ट्रेट, न्यायालय प्रयागराज यांचे न्यायालयातुन ट्रान्झीट रिमांड घेवुन आरोपीतास पुढील कारवाई कामी नवघर पोलीस ठाणे येथे आणण्यात येत आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अतिरिक्त पोलीस आयुक्त सो, मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील प्र.पो.निरी अविराज कुराडे, सपोनिरी प्रशांत गांगुर्डे, सपोनिरी पुष्पराज सुर्वे, पो.उप-निरी निखील चव्हाण,पो.उप-निरी राजु तांबे, पो.हवा./संजय शिंदे, पो.हवा./संतोष लांडगे, पो.हवा./अविनाश गर्जे, पो.हवा./प्रकाश गायकवाड, पो.हवा./सचिन हुले, पो.शि. प्रशांत विसपुते, पोअं/धिरज मेंगाणे, स.फौज. संतोष चव्हाण सायबर गुन्हे शाखा




--------ooooo--------